महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/ अधिसुचना/ ५ /२०२३ दि.१०/०१/२०२३

**"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"**

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात व वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्र.क्र. १३ नितीन कंपनी ते कोरम मॉल सर्व्हीस रस्त्यावरील संभाजीनगर जवळील कल्व्हर्ट बांधण्याचे काम करण्यात येणार आहे. सदर कल्व्हर्टचे काम हे नितीन कंपनी ते कोरम मॉलकडे जाणाऱ्या सर्व्हीस रस्त्यावर असून पुर्वेस मुंबई ते नाशिककडे जाणारा हायवे रोड व पश्चिमेस डॉक्टर प्लॅनेट हॉस्पिटलसमोर ५० फुट लांबी, २० फुट रूंदीचे कल्व्हर्टचे काम करण्यात येणार आहे. कोरम मॉल कडून नितीन जंक्शनकडे येणाऱ्या वाहनांना नितीन जंक्शनकडून सर्व्हीस रोडने कोरम मॉलकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करणे गरजेचे आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** कोरम मॉलकडून नितीन जंक्शनकडे येणाऱ्या वाहनांना तारांगण वसाहतीच्या गेटजवळ **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कोरम मॉल ते कॅडबरी जंक्शनकडे जाणाऱ्या सर्व्हीस रोडने किंवा स्लीप रोडने कॅडबरी ब्रिजखालून उजवे वळण घेवून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** नितीन जंक्शनकडून सर्व्हीस रोडने कोरम मॉलकडे जाणाऱ्या वाहनांना नितीन कंपनी येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नितीन ब्रिज स्लीप रोडने पुढे कोरम मॉल कट येथून डावे वळण घेवून इच्छीत स्थळी जातील. तसेच संभाजीनगर परिसरात राहणाऱ्या रहिवासी यांना प्रवेश राहणार आहे.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. ११/०१/२०२३ रोजीपासून (३ महिन्यांकरिता कल्व्हर्टचे) काम संपेपर्यंत अंमलात राहील.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

CamScanner

**प्रत कार्यवाहीकरीता :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी

CamScanner